# महाविद्यालय विकास समिति
## वार्षिक अहवाल २०२२-२३

सार्वजनिक विद्यापीठ अधिनीयम २०१६ मधील कलम ९७ अन्वये महाविद्यालय विकास समिती महाविद्यालयात गठीत करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालय विकास समितीच्या पार पडलेल्या बैठकीत झालेल्या कामकाजाचा आढाव पुढील प्रमाणे.

- पदवी महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या मागील सभेतील कामकाजाची माहिती सभेसमोर सादर करण्यात आली व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
- महाविद्यालयाला स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतरच्या तिसऱ्या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात आला. महाविद्यालयात सुरू करण्यात आलेले नविन अभ्यासक्रम, महाविद्यालयाची कामगीरी यावर सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले व सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.
- आर्थिक वर्ष २०२२-२३ चे अनुदानित व विनाअनुदानित विभागाच्या अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.
- आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या अनुदानित व विनाअनुदानित विभागांचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले जमा-खर्च पत्रक व ताळेबंद सभेसमोर प्राचार्यांनी सादर केले. त्यावर सविस्तर चर्चा होवून त्याला सर्वानूमते मंजूरी देण्यात आली.
- दि. ०१/०४/२०२२ ते ३१/०६/२०२२ या कालावधीत महाविद्यालयीन कर्मचा-यांनी उपभोगिलेल्या रजांचा तपशील सभेसमोर सादर करण्यात आला. सर्व रजा नियमानूसार योग्य असल्याने रजांना सर्वानूमते मंजूरी देण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा अंतर्गत गुणवत्ता हमी समितीचा अहवाल आणि सन २०२२-२३ चे शैक्षणिक कॅलेंडर सभेसमोर सादर करण्यात आले, त्याला सभेने मंजुरी दिली.

- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विभागातील विनाअनुदानित तत्वावर कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची कार्यभारानुसार नियुक्ती व वेतन निश्चिती करणे याबाबत चर्चा करण्यात आली. महाविद्यालयात रिक्त असलेल्या ०७ अनुदानित पदांवर तासिका तत्वावर नियुक्ती करण्यासाठी मा.सहसंचालक उच्च शिक्षण, पनवेल यांच्याकडुन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे सभेला सांगण्यात आले सदर ना हरकत प्रमाणपत्राला अनुसरून विहित पद्धतीचा अवलंब करून सदर पदांपैकी रसायनशास्त्र, इंग्रजी, अर्थशास्त्र व वाणिज्य या विषयांकरिता तासिका तत्वावर शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याचे सभेला सांगण्यात आले.

  शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठाने विहित केलेल्या कार्यभारानुसार आवश्यक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे सभेला सांगण्यात आले

- महाविद्यालयासाठी लागणारी स्टेशनरी महाविद्यालयाच्या विद्यार्थी ग्राहक भांडारातून खरेदी करण्यात यावी असा प्रस्ताव सभेसमोर ठेवण्यात आला. याविषयी बोलताना प्राचार्यांनी महाविद्यालयाला लागणारे कागद तसेच इतर स्टेशनरी ही आपल्याच महाविद्यालयाच्या ग्राहक भांडारात इतर विक्रेत्यांच्या तुलनेत कमी कीमतीत व दर्जेदार असल्याचे सभेला सांगीतले. ग्राहक भांडाराने या सर्व स्टेशनरीची खरेदी प्रक्रीया नियमानूसार घाऊक विक्रेत्याकडून दरपत्रक मागवून, कमी दरपत्रक असलेल्या विक्रेत्याकडून खरेदी करून केली असल्याचे सभेला सांगितले. यावर सविस्तर चर्चा होऊन महाविद्यालयाला लागणारी स्टेशनरी ग्राहक भांडारातून खरेदी करण्याचा ठराव करण्यात आला.

- दि. ०१/०७/२०२२ ते ३१/१२/२०२२ या कालावधीत महाविद्यालयीन कर्मचा-यांनी उपभोगिलेल्या रजांचा तपशील सभेसमोर सादर करण्यात आला. सर्व रजा नियमानूसार योग्य असल्याने रजांना सर्वानूमते मंजूरी देण्यात आली.

- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये पार पडलेल्या तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गांच्या तसेच एम.ए. एम.एस्सी. भाग २ परीक्षेचा निकाल प्राचार्यांनी सभेसमोर तपशिलवार सादर केला. महाविद्यालयाचा पदवी विभागातील कला शाखेचा निकाल ८५.११ % , वाणिज्य शाखेचा निकाल ९०.५३% तर विज्ञान शाखेचा निकाल ८९.२९ % जाहीर झाला आहे तर पदव्युत्तर विभागातील एम.एस्सी. चा निकाल ९८.५५ व एम.ए.चा निकाल १००% जाहिर झाला आहे असे सभेला सांगण्यात आले. तसेच सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेल्या आणि महाराष्ट्र शासनाच्या सुकाणू समितीच्या अधिसूचनेनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून पदवी अभ्यासक्रमाच्या प्रारूपात करावयाच्या बदलाला अनुसरून चर्चा करण्यात आली.

पदवी अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षात संशोधनावर असणारा भर विचारात घेता, ज्या विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आणि किंवा विद्यावाचस्पती संशोधनासाठी केंद्रास मुंबई विद्यापीठाची मान्यता आहे अशा विषयांमध्ये चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार करावा, असे मत अंतर्गत गुणवत्ता हमी समितीचे समन्वयक डॉ. प्रताप नाईकवाडे यांनी मांडले व या विचाराला सर्वांनूमते मंजूरी देण्यात आली.

NYA. ATHALYE, VED. SAPRE, VID. PITRE COLLEGE DEVRUKH

प्राचार्य